N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** लोणीकंद
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0746 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/07/2024 19:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 04/07/2024
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/07/2024
**Time From (वेळेपासून):** 10:46 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 31/07/2024 **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 039
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/07/2024 18:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 7 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** वाघोली पोलीस चौकी,ता हवेली जि पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned by CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नरेंद्र दिलीप मगर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सर्वे नं 26/1, सदगुरू पार्क,तुळापुर फाटा, , लोणीकंद, ता हवेली जि पुणे, लोणीकंद,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सर्वे नं 26/1, सदगुरू पार्क,तुळापुर फाटा, , लोणीकंद, ता हवेली जि पुणे, लोणीकंद,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9860101146

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | चेतन चंद्रकांत थोरवोले | | | 1. न्याती एलान, लिरीया एच-3,,3 रा मजला फ्लट नं302, बकोरी रोड, वाघोली पुणे ,लोणीकंद,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned by CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

जबाब दि.31/07/2024

मी श्री नरेंद्र दिलीप मगर, वय 32 वर्षे, व्यवसाय - शेती, रा सर्वे नं 26/1, सदगुरू पार्क, तुळापुर फाटा, लोणीकंद, ता. हवेली जि. पुणे, मो.नं. 9860101146

समक्ष अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, पुणे येथे हजर राहुन जबाब देतो की, मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्यावर माझे जन्मापासून कुटूंबियासह राहवयास असून,

मी, दि. 01/07/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, पुणे येथे तक्रार दिली की, मी वरिलप्रमाणे असून शाखा अभियंता म्हणून थेऊर म.रा.वि.वि कंपणी मर्या. येथे मागील एक वर्षापासून कार्यरत होतो. त्या दरम्यान माझेवर फौजदारी गुन्हा नोंद असलेबाबतची माहिती मी लपविली हा ठपका ठेवून मला दि. 19/06/2024 रोजी खात्यातुन बडतर्फ करणेत आले.

त्यानंतर मागील 6 ते 7 दिवसांपुर्वी मो. क्र. 8308444100 वरुन माझे मोबा.क्र.9860101146 यावर फोन करून समोरील व्यक्ती एपीआय चेतन थोरबोले बोलत असल्याचे सांगून त्यांनी माझे विरुध्द वाघोली पोलीस चौकी येथे तक्रार अर्ज प्राप्त झाला असून त्याचे चौकशीकामी आपण वाघोली पोलीस चौकी येथे उपस्थित रहा असे मला कळविले. मी अंदाजे दि 26/06/2024 रोजी सायंकाळी 06.00 वा चे दरम्यान वाघोली पोलीस चौकी येथे गेलो असता सदर ठिकाणी माझी भेट एपीआय श्री. थोरबोले यांचेशी झाली. त्यावेळी एपीआय श्री थोरबोले यांनी माझे विरुध्द इसम नामे श्री आकाश हरगुडे यांनी केलेला तक्रार अर्ज दाखवून त्याबाबतची माहिती दिली व "सदर अर्जाचा अहवाल निल पाठवतो, तक्रारदार यांना समज देतो व तुम्हाला या तक्रारीमुळे भविष्यात त्रास होणार नाही असे पाहतो" असे बोलून एक को-या कागदावर इंग्रजीमध्ये पाच लाख रुपीज असे लिहुन माझेकडे पैशाची मागणी केली. त्यावेळी एवढे पैसे दयायची माझी परिस्थिती नसल्याचे सांगुन मी निघून आलो.

त्यानंतर त्यांनी मला चार ते पाच वेळा संपर्क करून वाघोली पोलीस चौकी येथे भेटण्यास बोलाविले. तरी ते मागणी करत असलेली रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसून लाच रक्कम असलेची माझी खात्री झाली व ती त्यांना देण्याची माझी इच्छा नसल्याने मी एपीआय श्री थोरबोले, वाघोली पोलीस चौकी यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई व्हावी म्हणून ला.प्र.वि पुणे येथे लेखी तक्रार दिली.

त्या अनुषंगाने दि 01/07/2024 रोजी माझे तक्रारीनुसार पडताळणी कारवाईसाठी मी, दोन पंच, श्रीमती भोसले मॅडम व त्यांचे पथक असे पुणे नगर हायवेलगत खांदवेवस्ती येथे असलेल्या रिलायन्स ट्रेन्ड शॉपी/मॉल येथे एकत्र आलो. सदरवेळी श्रीमती भोसले मॅडम यांनी माझे व पंच नं 1 श्री वायाळ यांचे व्हाईस रेकॉर्डरमध्ये पडताळणी निवेदन घेऊन लोकसेवक श्री. चेतन थोरबोले यांची भेट घेणेकामी वाघोली पोलीस चौकी येथे व्हॉईस रेकॉर्डरसह पडताळणी कारवाईकामी रवाना केले. मी व पंच नं 1 असे वाघोली पोलीस चौकी येथे गेलो असता लोकसेवक एपीआय श्री थोरबोले यांची भेट झाली नाही त्यामुळे त्यांना माझे मोबाईल नं 9860101146 वरुन त्यांचे मोबाईल न 8308444100वर कॉल केला असता त्यांनी माझा कॉल घेतला नाही. सदर चौकीमध्ये चौकशी केली असता लोकसेवक श्री थोरबोले हे कामानिमित्त हायकोर्ट मंुबई येथे गेल्याची माहिती मिळाली. त्यामुळे सदर दिवशी पडताळणी कारवाई होवू शकली नाही. त्यानंतर दि. 02/07/2024 रोजी 17.57 वा.चे सुमारास लोकसेवक एपीआय थोरबोले यांनी त्यांचे मो नं 8308444100 वरुन माझे मो नं 9860101146 यावर कॉल करून मला दि.04/07/2024 रोजी सकाळी वाघोली पोलीस चौकी येथे भेटण्यास बोलाविले असता सदरची माहिती मी श्रीमती भोसले मॅडम यांना दिली.

त्याप्रमाणे श्रीमती भोसले मॅडम, त्यांचे पथक व दोन पंच साक्षीदार असे आम्ही दि.04/07/2024 रोजी पुणे नगर हायवेलगत खांदवेवस्ती येथे असलेल्या रिलायन्स ट्रेन्ड शॉपी/मॉल जवळ एकत्र आलो. सदरवेळी श्रीमती भोसले मॅडम लाप्रवि पुणे यांनी व्हाईस रेकॉर्डरसह मी व पंच नं 1 श्री वायाळ असे आम्हास लोकसेवक श्री. चेतन थोरबोले



Scanned by CamScanner

यांची भेट घेणेकामी वाघोली पोलीस चौकी येथे लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी कारवाईकामी रवाना केले. मी व पंच नं 1 असे वाघोली पोलीस चौकी येथे गेलो असता सदर ठिकाणी आमची लोकसेवक एपीआय श्री थोरबोले यांचेशी भेट झाली. त्यावेळी आमचे प्रथम माझे विरुध्द दाखल अर्जाचे अनुषंगाने चर्चा झाली त्यानंतर एपीआय थोरबोले यांचेबरोबर पुढीलप्रमाणे बोलणे झाले. एपीआय थोरबोले बोलले- पाच एक लाख, मी त्यांना बोललो -तरी पण आहे सर कन्फर्म पाच लाख म्हणल्यावर माझ्या डोक्यातं..... कसं काय करु मी? थोडं सांगायचं तूम्ही "" त्यानंतर एपीआय थोरबोले बोलले- झालं की काल परवा व त्यांनी एका कागदावर 1 Lakh असे लिहून मला दाखविले. मी बोललो - पन्नास हजार रुपये देतो तासाभरात, त्यानंतर एपीआय थोरबोले बोलले- सगळेच दयाना, मी त्यांना बोललो - ""सगळे नाही ना सर मला सर थोडासा वेळ दया पन्नास हजार रुपये तुम्हाला आज देतो परत पन्नास हजार रुपये लगेच देतो असे बोलल्यावर एपीआय थोरबोले यांनी- "या तुम्ही थोड्या वेळानी" असे बोलले असता मी त्यांना "तास - दिड तासानी येतो" असे सांगितले त्यावर एपीआय थोरबोले हे मला "हं◌ं" असे बोलले. अशा प्रकारे एपीआय थोरबोले यांनी मला माझेविरुध्द दाखल अर्जामध्ये मदत करण्यासाठी प्रथम पाच लाख रुपयाची मागणी केली व तडजोडी अंती 1 लाख रुपयाची लाच मागणी केली आहे.

त्याप्रमाणे सदर दिवशी काही कालावधीनंतर सापळापुर्व कारवाई दरम्यान मी 50,000/- रुपये लाच रक्कम म्हणुन श्रीमती माधुरी भोसले मॅडम यांचेकडे 500/- रु दराच्या 100 नोटा हजर केल्या असता सापळा पथकाने त्या नोटांचे नंबर संगणकावर टंकलिखीत करुन त्याची पिंरट काढुन त्यावर पंचाची व भोसले मॅडम यांनी सहया करुन त्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावून त्या लोकसेवक श्री थोरबोले यांना देणेकरीता माझ्याकडे देऊन मला व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्र.1 यांचेसोबत सापळा कारवाईकामी वाघोली पोलीस चौकी येथे रवाना केले व आमचे पाठोपाठ सापळा पथक येऊन विखरुन थांबले. मी व पंच नं 1 असे लोकसेवक श्री थोरबोले यांचे कक्षात गेलो परंतु ते उपस्थित नव्हते म्हणून त्यांना माझे मो नं 9860101146 वरुन त्यांचे मो नं वर कॉल केला परंतु त्यांनी घेतला नाही. त्यानंतर आम्ही सदर ठिकाणी बराच वेळ थांबुन राहिलो. त्यानंतर मी त्यांना पुन्हा फोनवरुन कॉल केले परंतु त्यांनी घेतले नाही. म्हणून सदर दिवशीची कारवाई स्थगित करणेत आली.

त्यानंतर दि 11/07/2024 रोजी मी, श्रीमती माधुरी भोसले मॅडम यांना केलेल्या विनंतीवरून एपीआय थोरबोले यांना लाच रक्कमेच्या अनुषंगाने भेटण्याबाबत दि.11/07/2024 रोजी मी, दोन पंच व सापळा पथक असे हॉटेल महाराजा, वाघोली जवळ भेटलो. त्यावेळी श्रीमती भोसले यांनी आम्हास सुचना दिल्यावर माझ्याकडे वरीलप्रमाणे रु. 50,000/- लाचेची रक्कम देवून पंच नं 1 यांचेसह व्हाईस रेकॉर्डर माझ्याकडे देऊन आम्हाला वाघोली पोलीस चौकी येथे सापळा कारवाई करीता पाठविले. सदर ठिकाणी लोकसेवक श्री थोरबोले उपस्थित नव्हते, आम्ही काही वेळ वाट पाहिल्यानंतर एपीआय थोरबोले हे त्यांचे वाहनाने लोणीकंद पोलीस स्टेशन येथे आले व पोलीस स्टेशनचे इमारतीचे आतमध्ये न येता एका इसमासोबत परत जाण्यास निघाले. त्यामुळे मी त्यांचे वाहनाचे जवळ गेलो असता एपीआय थोरबोले मला बोलले की,""तुम्ही जावा मी चार ते पाच दिवस नाही"" असे बोलून ते त्यांचे वाहनाने निघून गेले. सदरवेळी लोकसेवक श्री थोरबोले यांना संशय आल्याचे माझ्या लक्षात आले. त्यानंतर सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर दि 23/07/2024 रोजी मी, श्रीमती भोसले मॅडम यांना एपीआय थोरबोले हे उदया दि 24/07/2024 रोजी लाच रक्कम स्वीकारु शकतात असे कळविल्यानुसार दि 24/07/2024 रोजी मी, दोन पंच व सापळा पथक असे वाघोली येथे शांग्रीला हॉटेल जवळ एकत्र भेटलो. सदरवेळी सापळा अधिकारी यांनी आम्हास सुचना देऊन सर्व रितसर कार्यवाही करुन लाच रक्कम 50,000/- रु व व्हाईस रेकॉर्डरसह मला व पंच नं 1 यांना वाघोली पोलीस चौकी येथे लोकसेवक एपीआय थोरबोले यांनी भेट घेणेकामी पाठविले. मी व पंच नं 1 असे वाघोली पोलीस चौकी येथे गेलो. सदर ठिकाणी एपीआय थोरबोले यांची बदली झाल्याचे तेथील पोलीस कर्मचारी यांचेकडुन समजले. त्यामुळे मी, माझे मो नं 9860101146 वरुन एपीआय थोरबोले यांचे मो नं 8308444100 वर फोन करुन विचारले असता त्यांनी मला ""तुमचे अर्ज प्रकरण क्लोज केले आहे, येऊ नका"" असे सांगितले. एपीआय थोरबोले यांची कंन्ट्रोल येथे बदली झाल्यामुळे व माझेविरुध्दचा अर्ज निकाली काढल्यामुळे ते लाच रक्कम स्वीकारणार नाही याची मला खात्री झाल्याने सदर दिवसाची सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली. त्यानंतर लोकसेवक सपोनि थोरबोले यांचा पत्ता न्याती एलान, लिरीया एच-3, 3 रा मजला फ्लॅट नं.302, बकोरी रोड, वाघोली पुणे असा असल्याचे समजले.

तरी दि.04/07/2024 रोजी सकाळी 10.46 ते 12.16 वा चे दरम्यान वाघोली पोलीस चौकी, वाघोली येथे लोकसेवक श्री चेतन चंद्रकांत थोरबोले, सहाय्यक पोलीस निरीक्षक, वाघोली पोलीस चौकी, लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर, रा. न्याती एलान, लिरीया एच-3, 3 रा मजला फ्लॅट नं.302, बकोरी रोड, वाघोली पुणे यांनी माझेविरुध्द दाखल असलेल्या अर्जामध्ये अहवाल निल पाठविण्यासाठी व त्यामध्ये मला भविष्यात त्रास न



Scanned by CamScanner

होण्यासाठी 5 लाख रुपयाची लाच मागणी करुन तडजोडीअंती 1 लाख रुपयाची लाचेची मागणी केली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर तक्रार आहे.
वावरील टंकलिखीत जबाब मी वाचुन पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Savalaram Purushottam Salgaonkar(I (Inspector)) / DGPSPSM7307 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Savalaram Purushot
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPSPSM7307

पोलीस ठाणे अंमलदार
लोणीकंद पोलीस स्टेशन



Scanned by CamScanner